म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2829

# आभाळाचं दान

गणेश कुडे



REFBK-0023154
REFBK-0023154

अ८९१
काव्य
२३९४८

# ।। आभाळाचं दान ।।

गणेश कुडे

२४२९
०७१०५
२३७५८
संदर्भशास्त्र
20/3/09

REFBK-0023154
REFBK-0023154

• चेतश्री प्रकाशन । अमळनेर •

आभाळाचं दान
चेतश्री प्रकाशन

ABHALANCHA DAN
(Marathi)
GANESH KUDE

© सौ. शकुंतला कुडे

पहिली आवृत्ती :
९ फेब्रुवारी ८१ (वसंत पंचमी)

मुखपृष्ठ :
**सुभाष अवचट**

मलपृष्ठ छायाचित्र :
**सुरेश यशवंत**

मुद्रक :
**राजीव कुळकर्णी**
'क्रिएटर्स',
स्नेहसदन, नेहरुनगर, धुळे.

प्रकाशिका :
**सौ. यशोदा सोनार**
चेतश्री प्रकाशन,
देशमुख चाळ,
अमळनेर (४२५ ४०१)

मूल्य रुपये आठ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४२९
दा. क्र. २३९५४
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

तीर्थरूप आई आणि वडिलांना

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या 'नवलेखकांना उत्तेजन'
या योजनेच्या सहकार्याने.

आज पहिलाच कविता संग्रह प्रसिद्ध करताना अनेकांची आठवण होणे स्वाभाविक आहे. प्रा. म. वि. फाटक, अण्णासाहेब छापेकर, कै. प्रा. वि. म बेडेकर ह्यांनी सुरवातीला प्रोत्साहन दिले तर नंतरच्या काळात सत्यकथा, अभिरुची, साहित्य, नवभारत, छंद ह्यांच्या संपादकांनी माझी कविता छापली. श्री. वा. रा. ढवळे प्रा. द. भि कुळकर्णी ह्यांनी माझ्या कवितेचे कौतुक केले. श्री. वा. रा. सोनार, प्रा. भा. ज. कविमंडन, प्रा. रमेश वरखेडे, हे संग्रह काढण्यासाठी पाठीमागे लागले म्हणूनच आज हा कविता संग्रह रसिकांपुढे ठेवता आला.

मुखपृष्ठावरील चित्र प्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट ह्यांनी काढून दिले आणि शेवटच्या पृष्ठावरील छायाचित्र जळगावचे प्रसिद्ध छायाचित्रकार सुरेश यशवंत ह्यांनी काढून दिले. संग्रह छपाईचे काम क्रिएटर्स प्रेसचे श्री. राजीव कुळकर्णी ह्यांनी पत्करले. माझे कविमित्र पुरुषोत्तम पाटील ह्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. प्रा. कविमंडन ह्यांनी माझ्या कवितेची पाठराखण केली आहे. चेतश्री प्रकाशन व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ ह्यांच्या सहकार्यानेच हा संग्रह छापता आला.

ह्या सर्व चाहत्यांच्या ऋणात रहाण्यातच मला आनंद वाटतो. ही मायेची पाखर आहे म्हणूनच हा येथपर्यंतचा प्रवास.

– गणेश कुडे

…… पुनःपुन्हा येणारे हे संध्याकाळचे क्षण !
अशावेळी काय सोडून जाते अन्
काय धीर द्यायला जवळ येते,
हे समजून घेताना ही कविता
कासाविस होते ……

# ....ओंजळीत घेण्याआधी

'निरांजल्या चित्ताने' केलेल्या तळमळीची ही कविता आहे. गणेश कुडे यांच्या या कवितेला आजकालच्या प्रसिद्धीचा प्रकाश मिळाला नाही. हे बरे झाले. 'आणिक प्रकाशा मागो नये', या वृत्तीने हा कवी 'पाण्यात मढविलेल्या मातीत' या कवितेचे रोप रुजवितो...आणि परागांचे दान झेलण्यास अवघ्या देहाचे डोळे करून, प्रतीक्षेची मातब्बरी न मानता आपली हयात घालवीत बसतो. अपरंपार व्यथेचे खोलपण ही कविता मग मिरवू लागते. या जगाची न समजणारी अनेक दृश्ये पाहात ही कविता 'निळचा नभाच्या चंदापोरी' सारखी, सारेच अस्तित्व मावळल्यावर संध्याकाळी पश्चिमेची 'इवली कोर' पाहात बावरून डोळे पुसते. जगताना सांडलेले अर्थ कुठे गवसतील ? मित्र होऊन ज्या क्षणांनी तापलेल्या डोळ्यांना पिसांनी कुरवाळले, ते क्षण ही कविता शोधत बसली आहे. पण जाणाऱ्यास कधी 'थांब' म्हणता येते का ? सैरभैर मनाने जाणाऱ्यास बघावे लागते. 'देठादेठांत ठणकणाऱ्या' शिशिरातील पानांप्रमाणे असे वियोगाचे क्षण, ही कविता 'स्तिमित पाखराचे' निमूट डोळे घेऊन पाहात आहे. शिशिरातील झाडांच्या मोकळचा व्याकूळ फांद्या, संध्याकाळी वाढणाऱ्या अंधारात तळाशी पसरलेल्या पाचोळ्याकडे उजाड दृष्टीने पाहात असताना, ही कविता त्या फांद्यांची रात्री सोबत करणाऱ्या पाखरांप्रमाणे, या सुनेपणाला बघत बसते. मापलेली शक्ती पंखात घेऊन या विशाल व्यापात हाक देणाऱ्या एकुलत्या पक्षाप्रमाणे, ही कविता माणसाच्या मनाला कुठे आधार नाही, निवारा नाही, हें जाणवून 'नभाच्या नदीला असे का किनारा' असे विचारते.

पुनःपुन्हा येणारे हे संध्याकाळचे क्षण ! अशा वेळी काय सोडून जाते अन् काय धीर द्यायला जवळ येते, हे समजून घेताना ही कबिता कासाविस होते. दू-र जाणाऱ्या एकेक दिवसाला निरोप देताना, स्वतःचे जड झालेले शब्द ही कविता सावकाश ओठात चाळवते. प्रत्येक दिवसाने दिलेल्या यातना, याचना, भावना, संध्याकाळी कशा अर्थहीन दिसतात !

'तयालागी : शेज सरणाची :<br>
असो लाकडाची : चंदनी वा !'

मानवी अनुभवांची वाट मनात जमलेल्या पाचोळ्याच्या राशीतून जाते... काळोखात विझलेल्या वातीच्या पांढऱ्या धुरातून ती जाते...आपले सारेच हिरावून घेऊन जखमा शिल्लक ठेवणाऱ्या सोबत्यांच्या गर्दीतून ती जाते ... कलकलाट आणि किंकाळ्यांनी झाकलेल्या एखाद्या अनाथ हुंदक्याच्या बाजूने ती जाते ... जिथे सुख हळुवार स्पर्शाने वेचले ती बाग तुडवून टाकणाऱ्या रांगड्या प्रसंगातून ती जाते...दिशाहीन संघर्षांनी उडविलेल्या धुरळ्यातून ती जाते ...

पण ही अनुभवांची वाट एका दुर्मिळ प्रदेशातही पोचू शकते. या प्रदेशात प्रकाशाचा प्रखर जाच संपतो. प्रकाश स्मिता सारखा दिसतो ... प्रत्येक नव्या पावलास जखडून टाकणारी मर्यादा संपते आणि प्रत्येक पाऊलाखालची जमीन अथांग वाटू लागते. एखाद्याच क्षणाला रंग गंधांनी उन्माद देणारी दुनिया संपते आणि साऱ्या दिशांनीच एक सौम्य गंध येऊ लागतो! चारही दिशा स्नेहाने मनाला जवळ घेतात आणि अनुभवांचे आवर्त नाहीसे होतात. एक संथ गती वृत्तीला डोलावित राहते.

अशा संथ प्रदेशातून उच्चारलेला शब्द आणि जगलेली प्रतिमा अगदी वेगळ्या गुणांची असते. गणेश कुडे यांच्या कवितेत असे शब्द व प्रतिमा दिसतात, हे त्यांच्या कवितेचे एक फार दुर्मिळ असलेले वैभव आहे.

**— भा. ज. कविमंडन**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४२९
ग्रा. क्र. 23954
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## क्रम ।

आभाळ हे निवळले १
वाटुली २
कुंडीत रुजविले रोप ३
आकाशाच्या मनातले ४
नितळले जळ ५
मी तुझिया दर्शनदाने ६
ऋणे घेऊनी चाललो ७
दाट दुलईत अंग ८
घर ९
तुझी आठवण १०
व्यथा ११
दूरच दूर १२
श्रावणातली वाट १३
मी तुला कधीचाच पाहत आहे कुतूहलाने १६
नभ झाकळेल १७
संस्कृती १८
संपे भादव्याचे ऊन २०
तेज ये चैतन्ये ये २१
आळंदीत ज्ञानेश्वरा २२
शिशिर उरतो २४
निघून जाणाऱ्या पाखरांनो २५
निष्पर्ण साग एकाकी २६
माझ्या मनाचे पाडस २७
संध्या आली दारी २८
पहाटेच्या गारव्यात २९
पडसाद ३०

कणिका ३१

झाडे झाली मुकी ३२

हे ऊन जाळणारे ३३

घरदार झाले वैरी ३

भार व्हावे दुःख माझे

पाखरे कुठे जातील ?

थवा पाखरांचा ३७

गावझाडीत ३८

पाखरे सोडुनी जाता

संध्याकाळ ४१

शिशिराची पानगळ

नदीच्या काठाने

फुले वेदनांची ४७

सरण ४८

दुःख ४९

पंचमहाभूतांनो ५०

उन्हाने पेटले रान ५२

टाळ मृदुंगाच्या झाडा ५३

धूळ ५४

सूर उदास लागला ५५

तळ उठला जायचे ५६

प्राप्त व्हावे ५७

प्रकाशाचे दान ५८


□ □

## आभाळ हे निवळले

आभाळ हे निवळले ढग सर्वच पांगले
मावळत्या ह्या सूर्याने रंग रंग उधळले
तृप्त झाल्या आभाळाचे मन ओथंबून आले
हिर्व्या बोलीत पानांनी गीत सुरेल गायिले

नदी दुथडी वाहता काठ काठ हा भिजला
गढूळल्या पाण्याला का रंग रुपेरी लाभला
आभाळाच्या निळाईने जादू काही तरी केली
निळ्या बोलीत जलाने कशी साखर पेरली

आभाळाने दिले दान वृक्षवेलींनी झेलले
फांद्याफांद्यात तयांच्या पानाफुलात हसले
जमिनीचा भावगंध पिकातून प्रकटला
पाखरांनी चोचीतून आनंद हा सांगितला

□ □

# वाटुली

वाटुली ही साजिरी
आजूस वा बाजूस वा
या श्रावणाची गूढता
आकार घेउन ये नवा

हळुवार टाकित पाउले
एकाकि या वाटेवरी
अन् चिम्ब व्हावे मी उगा
वेड्याच ह्या श्रावणसरी !

□ □

## कुंडीत रुजविले रोप

कुंडीत रुजविले रोप
पाण्यात मळवुनी माती
भोवती पहारा नित्य
पापण्यात दडलेल्यांचा

तृप्तीत सांडतो काल
कुसुमांकित होता सृष्टि
कलहात निशा दिवसांच्या
उरतात पराग स्मृतींचे !

□ □

## आकाशाच्या मनातले

आकाशाच्या मनातले
हळू खाली उतरले
रेंगाळत निसटले

निसटले खाली जे ते
मुग्ध कळीला गावले
स्मितातून प्रकटले

प्रकटले मरुताने
सारसर्वस्व लुटले
आभाळाला सांगितले !

□ □

## नितळले जळ

नितळले जळ भाळ चुंबिले वायूने
नाते रेखिले निटिली आभाळीच्या निळाईने
बाभळीचे पीत धन हळदला काठ
पृष्ठभागी सावल्यांचे बन दाट दाट

उतरला वारा करी लगट लाटांत
मिसळला रव पावरीचा अचानक
चुडागर्द शेते पोसलीत पाण्यावर
रानमग्न गीत गंध देहमनावर
लपेटली घरे दूर वृक्षगर्दीतुन
उन्मीलते मंत्रमुग्ध इथे आठवण!

□ □

## मी तुझिया दर्शनदाने

तू मेघ नभातून येता
मी मोर बनुनी नाचावे
तू थेंब झिरपता खाली
मी मातीतून तो प्यावे

तू हसता हिरवाळीत
मी रंग तुझा रे व्हावे
तू फुलता कळी फुलात
गंधाने वेडे व्हावे

तू तुलाच उधळीत येता
मी त्यात गुंगुनी जावे
मी तुझिया दर्शनदाने
माझेपण हरवुन घ्यावे !

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४२९
ना. क्र. २३९५४
काव्य
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

## ऋणे घेऊनी चाललो

ऋणे चाललो घेऊनिया जगाची क्षणांची रूपे शोभली पाहिली
अनादी अशी वाट ही चालतांना युगांची मला साथ की लाभली
घनाधार भूमी मृगार्द्रात न्हाली कशी गंधदानात आनंदली
उले रोमरोमी कुठे अंकुरावी कुठे पसरल्या दाटल्या हिर्वळी

पिकातून दाणे खळ्यातून राशी मळ्यातून चैतन्य ओसंडले
मुखी पाखरांच्या सुरांच्या लकेरी कसे मुक्त आभाळ आच्छादले
नदीच्या किनारी मध्ये वाहणारी कृपा अमृताची सुखे गावली
इथे वाळवंटी जमे मांदियाळी कुठे धार भक्तीत ओसंडली

कुठे वाट पानाफुलातून जाई मिळे गर्द आश्वासक साउली
असे एकले चालता ह्या धुळीत तनू गीतगंगेत ह्या नाहली
कधी वृक्षराजीतुनी वाहणारी मिळे संगीताची सुखे साउली
तमाच्या वनातून घ्यावी सुखाने फुले जाणिवांची मनो रंगली

कधी तारकांच्या समूहात पिंगा किती चंद्र आकंठ मी प्राशिले
नभाचे महादान तेजात ल्यालो निळाईत गाणे मनी रंगले !

□ □

[library stamp]

## दाट दुलईत अंग

दाट दुलईत अंग
मार्गशीर्षाचा गारठा
सडा जरी चांदण्याचा
अंगावर उठे काटा

बंद खिडक्या, ही दारे
आणि सारी तावदाने
शुभ्र चादर गादीला
नाही निद्रेचे ग येणे

तोंड झाकून पडावे
टोल एकेक वाढती
निद्रादेवीच्या पूजनी
व्हावी उषेची आरती!

□ □

## घर

घर पिछाडीस उभे कसेबसे त्याचे
कंबर मोडावे तसे रूप हो आजचे
पिपळाला माहीत हे त्याच्या मुळचा जाणतात
नांदलेल्या पिढ्या किती झाल्या अस्तंगत
तुळयांची ऐट तेलकट मातटली
भिंती हसती विद्रूप पोक काढुनी काढुनी
खांब उभा कसाबसा ताठपणा मिरवत
कड्या वाकलेल्या तुटलेल्या खचतात
थकलेला जीव बसे खांबाला टेकून
मोजत बसला काही उरलेले क्षण!

□ □

## तुझी आठवण

विसाव्याला घरट्यात पक्षी यावा तसा
जीवनात त्यावेळी तू आला होतास.
आधार तुझा असण्याचा, हसण्याचा,
ध्येयासाठी धडपडण्याचा –
विरून जाणाऱ्या नादाप्रमाणे तुझी आठवण
पुसट पुसट होऊन जाते.
पण कधी काळी त्या नदीच्या काठी गेल्यावर
जेथे झाडातळी तास न् तास बसून संध्याकाळी
आभाळातील सूर्यास्ताचे रंग पाहात बसलो होतो वेडयासारखे.
कधी कधी तुझा फोटो आल्बममध्ये अचानक उवडून पाहिल्यावर
तुझ्या आठवणी भराभर गोळा होतात
वादळात पाचोळा गोळा होतो तशा.
पण तशाच मनात वादळी गरतगरत राहतात,
दूर दूर त्या आभाळाच्या दिशेने भिरकावल्या जातात
नि अचानक डोळे भरून येतात !

□ □

# व्यथा

व्यथा अशी खोल आहे
व्यथा आहे अपरंपार
मनातल्या कोपऱ्यात कुठेतरी उगवते
सूर्यफुलापरी छंद नेहमीच दाखवते
व्यथेनेच निर्मियेला जगात दानव
व्यथेनेच निर्मियेला जगातील देव
कथा आदिमानवाची तिचा आदि आणि अंत
तिने निर्मिलेत जगी महानसे ग्रंथ
ज्ञानेशाची ओवी आणि तुकाचा अभंग
वाळवंटी वारकरी तिने केले दंग
मीरेचेही वेड ह्याच व्यथेपोटी जन्मा आले
गंगेला पावित्र्य ह्याच व्यथेने दिधले
व्यथा अशी खोल आहे
व्यथा आहे अपरंपार

व्यथा होती म्हणूनच मांगल्य टिकले
आणि मानव्याचे जगी मंदिर जाहले
व्यथेनेच नांदविली आजवरी श्रद्धा
व्यथेनेच निर्मिलेत बुद्ध येशू सदा
व्यथा प्रत्येकाच्या मनी नांदते नांदते
व्यथा मानवाच्या कळिजात उमलते
व्यथा आसमंती येथे तेथे आहे
आकाशाच्या गाभाऱ्यात अनंतात आहे!

□ □

# दूरच दूर

दूरच दूर
निळ्या नभाची चंदापोर
संध्येसंगे घेई लकेर
हळुच गाई खुषीत गाणे
हसण्यामाजी दिसते चूर

किणकिण किणकिण घंटानाद
हंबारव हा घुमतो दूर
उठे नभीं अन् लाल धुराळा
त्यातच पावा काढी सूर

सळसळ पाने वाहे वारा
सर्दारापरी डुले शिवारा
मैलाचा हा दगड बाजुला
घेइ युगाची निद्रा घोर

पल्याडच्या त्या माळावरुनी
येतो चालत तांडा थोर
सुरकुतलेल्या तरण्याताठ्या
गळून गेला ज्यांचा नूर

दूरच दूर

जमला तांडा तारांचा
गजबजले नभ गंगातीर
पिंगा चाले गोफ घालती
हसणे पसरे दूरच दूर

दृश्ये पाहत बसली ती
मावळतीला इवली कोर
मूक आसवे गाळित अन्
परत फिरे ही चंदापोर !

□ □

# श्रावणातली वाट

श्रावणातली वाट
शिरव्यांनी ओली,
सुस्तीत मस्त सुखावलेली,
झपझप चाल परतीची,
ढगात बुडलेल्या छायांची.
रेशमी उन,
ओथंबलेले आभाळ,
खुषीत हसतो हिरवा माळ.

'पाचलाच उठली,
आवर सावर केली,
भाकरी चार चुलीवर टाकून
धुणं पाणी केलं.
सासूला म्हटलं —
करून ठेवलं तेवढं खाऊन घ्या.
उठली नि शेजारी जाऊन बसली.
मनात म्हटलं, खाऊन घे.
दिवसभराचा ताण कसा सहन करशील ?
उठली नि दोन घास खाऊन घेतले,
एक भाकरी संगे बांधून घेतली.'

'नाहीतर काय ?
आयतं मिळतं तर ही टेक !'

'रोजचं असंच —
पोराला बोलावं,
म्हातारी म्हनते —
मलाच बोलली.
बोलावं कसं हे बी कळेना.'

झपझप वाट,
घराची ओढ,
संवादात पक्ष्यांची मिळते साथ.
डोक्यावर हिरव्या गवताचं भारं.
'गाईची काळजी ती बी मलाच.
देर आहे, जेठ आहे,
खातात, बसतात नि झोपतात.
ते बी थकून भागून येतील.
सुखाचा शब्द त्यांना नको.'

बोर हिरवी गार,
बाभळी काटेरी,
वेली झाडावरुन लवल्यात फार.
गवताची पाती
थेंबात न्हाती.
वाट मऊ मऊ,
सासुरवासणीच्या पायाला
सुख थोडं देऊ.
झरा झुळझुळू
वाहे हळुहळू.
'घोटभर पाणी पिऊन घे
लव्हाळीचा पाळणा करून दे.'

बाजरीला पाहून हसली ज्वारी –
'वाढून वाढून किती वाढशील
किरकाडी भिरकाडी भिक्कारडी.'
' वा ग वाऽ
ठेंगणी ठुसकी
नाकात बसकी !
काय पण तोरा,
तुझ्या नशिबी नुस्ताच वारा !'

बांधावरले गवत खो खो हसले,
वाऱ्याबरोबर नाचत सुटले.
मऊमऊ वाट
वेशीत शिरली,
बाळाच्या आठवणीत
खुषीत हसली !

□ □

## मी तुला कधीचाच पाहत आहे कुतूहलाने

जवळ आलो कधी काळी वाटांनी शोध घेण्यासाठी
वाटाच वाटा हाकारीत होत्या अंतरंगात तुझ्या येण्यासाठी

कुठली वाट निवडावी बुचकळ्यात पडलो पुष्कळदा
उभा राहुन दूर इथे न्याहाळत असतो रूपसंपदा

तुझ्या रूपाचा अनिवार मोह दुरूनच प्राशन करीत असतो
आभाळाच्या निळाईला तूच गडद डूब देत रहातो

शेते इथली काळीभोर आणि निळी निळी तुझी आभा
हिरव्या पिकात जमत असते नित्य पाखरांची सभा

हुंकारणाऱ्या पारव्याचे गीत मनाला उदास करीत असते
एकलेच झाड निष्पर्ण त्याच्या नग्नतेतही मिरवत असते

किनार क्षितिजाला निळी तुझी झळाळ वेगळीच देत असते
वारे येतात वाहत त्यांची साद मनाला भावत असते –

□ □

## नभ झाकळेल

नभ झाकळेल   आणि खाली कोसळेल
मयुराचा साद   आसमंत घुमवील
पिसाऱ्यात डोळे   घननृत्य पहातील
थेंबा मागुनी थेंबात   कण कण सुखावेल
गंध मस्तीत रंगेल

जमिनीत गर्भ   स्वप्न नशेत गुंगेल
पानापानात वृक्षांच्या   हितगुज संभवेल
स्मितसंभारात   भोवताल विनटेल
स्वप्न साकारेल   माझे गीत आकारेल !

□ □

## संस्कृती

सैकत रणरणलं
दमलां
झालास श्रांत
कुण्या गावचे पुसण्याआधी
या हो या पांथ

ही माझी इवली
झोपडी
सावलीत आत
संकोचावे तुम्ही कशाला
व्हा थोडे शांत

कुंभही हे भरले
जलाने
पाणी घोट घोट
पिउनिया मग जावे पुढती
दीर्घ असे वाट !

*

शिवार हिर्वळलं
औंदाचं
साल बरं आलं
गतकाळाची आठवण होता
पाणी टचटचलं

पवळीचा 'मंगू'
दुकाळी बाजारी गेला
आज गळ्यामधि गळा घालुनी
राया ढसढसला

हंबरली पवळी
आसवा
मिळे करुण साथ
बावरल्या डोळ्यांनी पाही
समोर कुरणात !

□ □

## संपे भादव्याचे ऊन

संपे भादव्याचे ऊन
नभ निळाईत न्हाते
स्वच्छ धुतल्या तेजाची
दारी पंगत बसते

नुक्ती वर्षून गेलेली
रिमझिम पावसाची
मस्त रंगात रंगली
कथा गोड आश्विनाची

आश्विनाच्या अंगणात
शुभ्र प्राजक्ताची शेज
सखी माहेरवाशीण
दूर डोळ्यातून नीज !

□ □

## तेज ये, चैतन्य ये

तेज ये चैतन्य ये
ये जागृती स्वप्नातुनी
विश्वास ये, मांगल्य ये
रात्रिच्या गर्भातुनी

सरली कथा मधुरात्रिची
सरत्या तमाची भैरवी
आशा पहाटे जागुनी
मांगल्य भूपां आळवी

धुंदी सरे मदिरेतली
चांचल्य वा भेटीतले
जाग ये बांगेतुनी
तेजातुनी जग दीप्तले

सौंदर्य मजला गावले
की प्रत्यया सौभाग्य ये
आभाळ व्यापुनिया उरे
जो लालिमा प्राचीस ये !

सम्मार्जनी ये शूचिता
वरि रंगवल्ली हासरी
समईत उरली वात अन्
ओवी सरे जात्यावरी

तेज ये, चैतन्य ये
ये जागुती स्वप्नातुनी
मांगल्य ये, विश्वास ये
रात्रिच्या गर्भातुनी !

□ □

# आळंदीत ज्ञानेश्वरा !

आळंदीत ज्ञानेश्वरा
चाले पुण्याचा विकरा
तुझ्या नावावर जमे
ढोंगी साधूंचा पसारा

आज तुझ्या समाधीला
वेढा ढोंगी पुजाऱ्यांचा
सौदा चाले आगळाच
पैशासाठी लाचारीचा

सर्वस्व गा होवुनिया
ज्याने निष्ठा नांदविली
त्याच्या समाधीच्या पुढे
लोलुपता बळावली

ज्ञानियाच्या राजा तुझे
राज्य महाराष्ट्री नांदे
राजधानीत तुझीया
पैशालाच तेज चढे

साडे पंध्राच्या दरात
देशी सोने ह्यांना जर
ज्ञानेश्वरीची तयांना
मुळीही न मातबर

कंठरव कधी ह्यांचा
ऐक एकदा जागून
त्यांच्या साध्या बोलातून
जिव्हाळ्याचा पडे खून

छान केले ज्ञानदेवा
तुवा नाव कमविले
आणि त्याच्या बळावर
ह्यांचे आसन स्थिरले

मनी होते काही न्यारे
भेटायचे एकान्तात
भावफुले वहायाची
कांक्षा होती या मनात

ज्ञानियाच्या राजा तुला
सांगायचे होते खूप
शब्द तसेच राहिले
परतलो गुपचूप

अनावर होऊनिया
आसू निपाटिले देवा
ज्यांनी केले तुझे हाल
त्यांचा तूच झाला ठेवा

चंदनाच्या लेपनात
होवो तुझे सांतवन
परी अंतरात माझ्या
डोंब पेटतो दारुण

कशाला ही मंदिरे अन्
कशाला ही ढोंगी पूजा
महाराष्ट्र - भूमीतून
तुझ्या नावाचाच वाजा !

□ □

## शिशिर उरतो

शिशिर उरतो उमलणाऱ्या ओठांत कुसुमांच्या,
कथा अबोलीच्या परागात ज्यांच्या असतात दडलेल्या,
वारा झिंगून पडलेला असतो दव प्यालेला,
पानांच्या कानात काहीबाही सांगत असतो तळाशी विसावलेला.

उदास गती धरतीची शांतीचे गीत गात बसलेली,
तारेवर जमलेला स्तिमित पाखरांचा निमूट थवा,
बाभळी हळदगोऱ्या उभ्या काठावर नाल्याच्या,
ढगांच्या दुलईत आभाळ दडलेले चाहूल चैत्राची घेत असलेले.

सोनेरी वर्ख लावलेली पाने गात आहेत गीत विनाशाचे,
देठादेठात ठणकणारी पाने उदास गीत गातात वियोगाचे,
सुसाटलेल्या वाऱ्याच्या पालखीत बसलेली पाने आकाशगामी,
सूर उमटत आहेत झाडांच्या फांद्यांत तरीही कुठे भूपरागाचे !

□ □

# निघून जाणाऱ्या पाखरांनो

जुने घर त्याच्यामागील सळसळणारा पिंपळ आता थकलेला
चांदण्या रात्री सांगितलेल्या कथा अनिवार तेथे ऐकलेल्या
मनाला करतात बेजार अजूनही लावतात हुरहूर तेथे गेल्यावर
सळसळणारी पाने त्याची अजून आळवितात तोच सूर
आज वाटते तेथे जावे सांडलेले काही शोधावे वेचावे
पानांच्या रेषेत खोल खोल काहीबाही पहात रहावे

शाळा त्यावेळची उखणलेली मोडकळीस आलेली
तरी रातराणीच्या नि कण्हेरीच्या गंधात हरवलेली
अजूनही आठवतात गुच्छ कण्हेरीचे अमाप तोडलेले
मित्र त्यावेळचे पाखरापरी दूर दूर निघून गेलेले
शाळेचा तास कधी गाभुळल्या चिंचांजवळ सरून जावा
नाल्याच्या काठी बाभूळबनात खेळात गप्पात पार पडावा
रानावनात काटयाकुटयात हिंडताना साथ हिर्वळीची
अजून मनात ठसलेली शेताशेतातील वाट वर्दळीची

आभाळात उंच उडलेले पतंग आशांचे आकांक्षांचे
दिलदार चंद्राचा मागोवा घेत अंगण हवे होते तारकांचे
ती परिचित वाट झाडांची दाटी खुणा जेथील आळवणाऱ्या
अजून कथा राहिल्या तशाच रात्रीत कधी न संपणाऱ्या
निघून जाणाऱ्या पाखरांनो ! तुमचा चिवचिवाट कानी पडताना
मन होते सैरभैर तुमच्या गतीचा ठाव घेत असताना
तुमच्या गीतांचे साद पडसाद घुमत रहातील दीर्घकाळ
चिंतनात त्यांच्या मनाला वाटत राहील एक पर्वकाळ !

□ □

## निष्पर्ण साग एकाकी

निष्पर्ण साग एकाकी अन् माळ पसरला दूर
तू लकेर घेउन आलीस पानात सांडले सूर

लयकारी सूर तुझे ते धुंदीत चालले गान
अन् कुणा राजसाचे गे गीतात गुंतले प्राण

उच्छ्वास सुगंधी सुटले मिसळले उसासे त्यात
स्वप्नात तारुण्याच्या त्या बहरात रंगली रात

ह्या सागवनातील वारा मदमस्त शराबी बनुनी
ओठात गुणगुणे अजुनी ती प्रेमकहाणी

हे पठार व्याकुळ बनते दूरात वाहते धार
ही रेवामाई वहाते धारेत घेऊनी सूर !

□ □

# माझ्या मनाचे पाडस

माझ्या मनाचे पाडस
चुकले हो रानोमाळ
दूर राहिले स्थानक
दूर राहिला तो माळ

कधीकाळची ती कथा
सरे नुरे पडे पार
आज उरला केवळ
ज्याचा काही बडिवार

त्याच स्वप्नसुखासाठी
तरळती प्रतिबिंबे
त्यांच्या साकारण्यासाठी
मन येथे तेथे हिंडे

गुंफा भयाण ही दरी
उठे नाद गुर्गुरीचा
आणि अंतरात जागे
ध्यास दूरच्या धामाचा

दूर राहिले ते धाम
दूर राहिला जिव्हाळा
येथल्या ह्या वास्तवात
जागा झाला कळवळा

सारे विसरून आता
सर्वस्वाचा मीही उरे
जागतील आणि भाव
मीच माझा माझे सारे !

□ □

## संध्या आली दारी

येथे मी बसलेलो
गच्चीवर एकान्ती
बाजूचे हे झाड
सळसळ गाते गीत

मावळतीला दूर
लाल गेरुवा रंग
तुरळक मेघांमधुनी
झिरपत आला लांब

छटा तयांच्या काही
ओढ्यामाजी लवल्या
चुंबून गढूळ पाणी
माझ्या जवळी आल्या

एक उगवली तारा
साथीला ये दुसरी
गीत तमाचे गात
संध्या आली दारी !

□ □

## पहाटेच्या गारव्यात

पहाटेच्या गारव्यात
सळसळ पिंपळाची
चमकत्या तारकांची
शोभा तेजाळ शुक्राची

जात्यावर आळविली
ओवी कुणीशी लयीत
आळसल्या मनावर
गेली गोडवा सांडत –

'पोसला ग मळ्यामंदी
घड हिरव्या केळींचा
ठाव घेतला तव्हाच
सासुबाईंच्या डोळ्यांचा

येत्या वैशाखात बाई
वर्स होइल लग्नाला
काय उत्तर मी द्यावे
सासुबाईंच्या चेष्टेला !'

□ □

## पडसाद

रेंगाळत आले माझ्या कानावर
तुझे मधुस्वर स्वरांगने

रागदारी तू जी आळवली होती
अजून ती स्वांती ठसलेली

आज शेष काय दूर तुझी मूर्ती,
क्षितिजाच्या अंती लोपलेली

आणि त्याच ठायी वाटते अजून
आलापिते कोण रागदारी

उगमते मग तेच पडसाद
घालितात साद वेड्या मना!

□ □

## कणिका

खय्यामा, स्वप्ने तुझिया नगरीमधली
मूर्तांच्या रूपे मजभवती रे जमली
  मी मूर्तामधुनी अमूर्त शोधित असता
आकंठ बुडालो मदिरेच्या फेसात
अन् पुन्हा लागतो गुंगाया स्वप्नात !

तारुण्य उधळितो मधुमासी हा वृक्ष
घवघवली पर्णे देतो त्याची साक्ष
  अन् वर्षर्तूची वीज कडाडे गगनी
क्षण एक येउनी जाळित पर्णे गेली
निष्पर्ण वृक्ष लाजेने पाही खाली !

अन् काळाची उन्मत पाऊले आली
मम बाल्यामधली दुनिया तुडवुन गेली
  का उसंत मजला मिळू नये थोडाही
घडि दो घडी बघण्या वळून मागे आज
जो जीर्ण जाहला माझा जीवनसाज !

□ □

## झाडे झाली मुकी

झाली संध्याकाळ
झाडे झाली मुकी
पाखरांच्या मुखी
व्याकुळता

तळाशी पाचोळा
शुष्क देह उभा
पाहतसे नभा
आशाळून

उजाड जीवाला
नभ पांघरूण
खालती जमीन
अस्ताव्यस्त

येता अंधारून
फांद्याफांद्यातून
सुनेसुनेपण
आक्रोशते

□ □

## हे ऊन जाळणारे

हे ऊन जाळणारे मी पांघरून घ्यावे
अन् तापल्या धुळीत मी आसनस्थ व्हावे

काटयात हासणारी वेचून फुले घ्यावी
झाडात वेदनेची कोठे कळी फुलावी

वाळूत चालताना पाणीच आटलेले
काठास हाक देत व्याकूळ प्राण नेले

दूरात वाहणाऱ्या वाऱ्यास साद द्यावी
वाटेत चालताना निष्पर्ण साथ घ्यावी

क्षितिजात लक्षिलेले आभाळ दूर गेले
मार्गात सांडलेले मी तेज प्राशिलेले !

□ □

## घरदार झाले वैरी

घरदार झाले वैरी
वागण्याची तऱ्हा अशी
एकाकीच चालताना
मन आपसुख सोशी

आता सोसण्यात सुख
असे सोसतच जावे
जळताना उभा जन्म
अंग प्रकाशाचे व्हावे

निस्संगता पांघरावी
आपुल्याच हितासाठी
रात्री उजळून घ्याव्या
आनंदाच्या दिठीसाठी

अशा दिठीला जपावे
मोल जन्माचे देऊन
दान घ्यावे नक्षत्रांचे
सारा काळोख गिळून !

□ □

## भार व्हावे दुःख माझे

भार व्हावे दुःख माझे
कुणावरी घालू ऐसे
ओझे आपले आपण
न्यावे वाहून आपैसे

दारातच थांबलो मी
कुणा हाक मारू कशी
हाटात ह्या गर्दी देखे
चाल व्हावी सावधशी

आश्वासन सनातन
गंध दाटे चिरंतन
साद येई सान्तातून
उजळत्या दिशांतून

हाच अनंत विश्वास
प्रकाशात मूर्तिमंत
हाक कंठातील माझी
पसरते दिगंतात !

□ □

## पाखरे कुठे जातील ?

पाखरे कुठे जातील
सरल्यावर काळ सुगीचा
पेटले रान वेल्हाळ
आधार तुटे वृक्षाचा

आभाळ झाले वैरी
जाहल्या दिशा वैराण
पंखांनी कसे उडावे
ग्रीष्माचे दाहक ऊन

संपले गान रानात
कोठून साद येईल
उतरला सुखाचा साज
हुंकार कंठि दाटेल !

□ □

# थवा पाखरांचा

थवा पाखरांचा कुठे थांबलेला
आधार कोठे  कुठे वा निवारा
उध्वस्त वैराण  सारा पसारा
नभाच्या नदीला असे का किनारा

पंखात शक्ती  असे मापलेली
कंठात ये हाक कैसी विशाल
खुणा जागजागी उभ्या फसविणाऱ्या
मिळावा कुठे भरवसा आणि ताल ?

थवा पाखरांचा कुठे चाललेला
इथे ना निवारा कुठे हो निवारा
इथे ना तिथे ना कुठे हो निवारा
नभाच्या नदीला असे का किनारा ?

□ □

## गावझाडीत

गावझाडीत
आंबेबनात
ओढयानजीक
नांदे डौलात
उंच वाड्याचे
रूप दिसते
"उंच माडीचा
धनी भाग्याचा"

वाट अडते
कोठे बुडते
काठाकाठाने
तृण दाटते
झाड वाकुनी
रूप पहाते
चिंच चिवट
छाया दाटते
गर्दी मुलींची
झिम्मा खेळते
"फुगडी फू
ग फुगडी फू
दादल्याचा धाक
नको ग दावू"

पिंपळपाराला
उभा मारुती
कुठे फांदीला
घंटा लोंबती
गप्पागोष्टीत
ऊन टळते
कडा पश्चिमी
धुळीत रंगते
"धाव गोपाळा
सख्या विठ्ठला
भजनी रंगला
गळा गुंतला"

चुली पेटल्या
धूर दाटला
झाडीमधुनी
वर चालला
बुडे अंधारी
गाव झोपते
ओढ्याकाठाने
भूत जातसे !

□ □

## पाखरे सोडुनी जाता

पाखरे सोडुनी जाता
वृक्षमने व्याकुळतात
ओसाड बने वनराई
शून्यता येई घरट्यात

उध्वस्त होत आधार
गुंतेल कुठे मग चित्त
सावली सुखाची दिधली
सोसले सर्व आघात

घरट्यात गुंतले प्राण
मन वृक्षाला बिलगून
आसमंत ओळख ठेवी
रमविले गाऊनी धून

पसरिले पंख यात्रेला
कंठात घेऊनी सूर
घर दिशादिशात कुठेही
झेपावत जाणे दूर !

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४२९
दा. क्र. २३९५८
काव्य
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# संध्याकाळ

दाटता काळोख  दडपते मन
सुन्न अकारण  भवताल
मनाचा गाभारा  वाहो ओसंडून
असे काही धन  साचलेले
येथे असूनही  येथे नाही ऐसा
भाव मनी कैसा  दाटताहे

अशा सायंकाळी  गेल्या अगणित
करिता गणित  मेळ नाही
पालापाचोळ्याची  गत यावी क्षणा
जन्म तरी उणा  चालण्यास
चालण्याची हौस  फिटो पुरी ऐशी
आणि कासाविशी  उगीच ही

झेपावत यावा  पक्षी घरट्यात
काळोख चालत  येई तसा
वाटा बुजलेल्या  ओळखपारखा
प्रदेश सारखा  येई पुढे
आभाळाचा अर्थ  जीवा कळो यावा
नक्षत्रांनी द्यावा  धीर मना !

□ □

## शिशिराची पानगळ

शिशिराची पानगळ
आणि मनच विव्हळ

सांजलेली हाक मिळे
गंध वाळुनिया गळे
पानोपानी माखलेली
पसरते धूळ !

पाखरांच्या मुखांतून
यावी विमनस्क धून
झाडाझुडूपात येते
कंपित चाहूल

साद वाऱ्याची कुंठित
व्यर्थ नभा कवळित
कुठे पसरशी मना
फाटकी वाकळ !

□ □

## नदीच्या काठाने

नदीच्या काठाने वाळू भिजलेली
झाडे दाटलेली ऐसपैस

उभा राहे गाव दोन्ही तीरावर
लाभला आधार जीवनाचा

घाट दिमाखात उभा राहे धीट
विसावली दीठ समाधीत

समाधीचे सुख जीवा कळो आले
वाळूला गावले असंख्यात

वाळू गाते गीत विकल एकांत
समाधी ऐकत संतोषात

०००

नदीच्या काठाने देऊळ एकले
काळोखी बुडले जगन्नाथ

भंगल्या भितींना भेसूर एकान्त
पाखरे निवान्त कोपऱ्यात

पाचोळयाची पूजा पिंडीला लाभावी
फुलांनी मुंफावी व्यथा मात्र

०००

नदीच्या काठाने		चाले दीपदान
भावे तनमन		समर्पण

वाती शरीराच्या		पात्रीं जळो ऐशा
आणिक प्रकाशा		मागो नये

असा मार्ग नित्य		पाहू उजळता
उरो नच व्यथा		कशाचीही

०००

नदीच्या काठाने		जीवन वाहता
फुलतील कथा		अहर्निश

भरली घागर		भरल्या संसारी
काय मातब्बरी		कष्टांचीच

चढ-उतारात		पाणी हिनकळे
चित्त नच चळे		समाधानी

०००

नदीच्या काठाने		चाललासे रथ
श्रद्धा आंदोळत		वाळवंटी

ओढताना रथ		पिढ्या पालटती
सावकाश गती		चिरंतन

चालली पालखी		दिंड्यापताकांत
भक्ती ओसंडत		मार्गातून

०००

नदीच्या काठाने चाले येरझार
ऐलपैल तीर गजबजे

शंकांचे काहूर उत्तरे अनंत
वाटा ह्या दिगन्त अकल्पित

दिल्याघेतल्याचा होतसे हिशेब
कसा द्यावा जाब अन्वर्थक

०००

धार आटलेली तडफडे मासा
कुणि दे दिलासा आश्वासून

वाळूची ही रास माझी गा मिरास
सुखे घ्यावा श्वास ओलावला

भिजे अंतरंग तरीच अभंग
पुरतील पांग वेळोवेळी

०००

नदीच्या काठाने ओढ अनामिक
गती अगतिक अभावित

वाळूतील वाटा कुठे धावतील
कसे आकळेल अज्ञपणी

धावत्याचे ध्येय अधान्तरी नित्य
किनाऱ्यास सत्य ठावे पूर्ण

०००

किती आले पूर किती गेले पाणी
पुरतसे धणी काठाचीच

काठाला ठाऊक पाण्याचे इमान
वृक्षवेली गान गुंजतसे

शेवाळले पाणी झाके अंतरंग
खडक निस्संग उभा मध्ये

०००

ठसे पाऊलांचे येथे येणारांचे
कुणाचे कुणाचे अज्ञातांचे

वाळूचेही कण मोजता अपुरे
मनाने बावरे व्हावे ऐसे

ठसे पुसतील वाळूच उरेल
कुठे कशी ओल धुंडाळावी ?

□ □

# फुलें वेदनांची

फुले वेदनांची इथे वेचताना सुखे जीव गंधात हा न्हातसे
कुठे वृक्षवेलीतुनी आर्ततेचे कसे गीत रानात चीत्कारले
मना भुलविती ह्या कुठे दूर वाटा चुकांची किती वर्तुळें जाहली
कसा मार्ग काढू ? कुठे जावयाचे? कुठे लक्ष्य मार्गात ठेवियले?

मुळे ह्या जगाची रुजावी धुळीत फुले आणि पाने कशी रंगली
मनाने अशा रंगयाचेत जाता कुठे भरवशाची मिळे सावली
सुगीच्या जगी काळ गेला सुखाचा कशी प्रीत पानातुनी हासली
अशा संगती रंगता देह धाला मना वेगळ्या लागल्या चाहुली

कुठे रंग पानाफुलांतून गेला कुठे पाखरांचा थवा चालला
नभा सोडुनी चाललें शीत वारे सुरु जाहल्या ह्या उन्हाच्या झळा
मिळे शावकांना कुठे साउली अन् वैराण रानी कुठे आसरा
नदी आटलेली कुठे शीळ माळावरी पारखी अन् दिसेना झरा

कसे गुंतवावे मना शुष्क रानी नसे साथ वा हाक दूरातुनी
अशा खिन्न निष्पर्ण मार्गात जाता मुके गीत कंठात ये दाटुनी
मळा आसवांनी असा सजविलेला फुले गीत पुष्पात हा ताटवा
मना घोर काळोख रात्री दिलासा जसा देत रानातही काजवा ?

□ □

# सरण

संपला प्रवास
अखेरली वाट
जीवनाचा थाट
राखाळला

संपल्या यातना
संपल्या याचना
सकल भावना
संपुष्टल्या

आशाआकाशांचे
मनोरथ मूर्त
पूर्ततेस शर्थ
नलगेच

युगाचा हा पांथ
पहुडला शांत
उद्यासाठी खंत
स्थिरावली

आणि तयालागी
शेज सरणाची
असो लाकडाची
चंदनी वा !

□ □

## दुःख

दुःख जसे हलाहल
काळोखाला समांतर
रूळ धावती दिशांना
कसा घालावा आवर

दुःख डोह भरलेला
नये उपसता तळ
खोल खोल जावे तसे
मनी अमृत कल्लोळ

दुःख पात्र सरितेचे
असंख्यात रमणारे
ज्वाला उराशी धरून
सचेतन जागणारे !

दुःख आभाळ विस्तीर्ण
दिशा दिशा व्यापणारे
कर अनंत तेजाचे
पसरून हसणारे

□□

# पंचमहाभूतांनो

पंचमहाभूतांनो
हविर्भाग आज तुम्हा
स्वीकृत हे घ्या करुनी
तुमचे हो धन तुम्हा

एकत्रित करुनी जो
मानव हा निर्मियला
पशु पक्षीचर जे त्या
जन्म तुम्ही जो दिधला

यज्ञाचे होमकुंड
विश्वाच्या प्रांगणात
शतकांच्या अग्निजळे
ब्रह्म्याच्या क्रीडण्यात

तुमच्या रे साठणीत
विश्वाची हालचाल
तुमच्या रे विघटनात
विश्वाचा शून्य खेळ

अनद्यतन तुम्हाला
ठाव नाही ना ठिकाण
नर्ताया एक असे
मात्र जगाचे अंगण

पंचमहाभूतांनो
तुमचा हा हविर्भाग
आज पुन्हा तुमच्या प्रत
आला हा महाभाग

□□

अर्पण हे आज तुम्हा
द्रव्यांचे सम्मीलन
दूर तिथे खोपट्यात
एक उरे आक्रंदन

नौबत भेरी झडू द्या
गर्जू द्या भीषण धन
भूवरले लोपू द्या
मायेचे आक्रंदन

माया दो घटिकांची
काळाचे द्या लिंपण
किति आले किति गेले
घटकेचे आक्रंदन

विश्वाच्या घरट्यातिल
पूजन हे आज सरे
तुमची अन् एक पूजा
अंतीची मात्र उरे

वायो हे नील गगन
तेजाच्या परमेश्वर
मातो हे वरुणेश्वर
जगताचे विश्वंभर

आज महातर्पण हे
ज्वालांचे हो नर्तन
स्वीकारा हविर्भाग
तुमचे हो हे युगधन

□□

## उन्हाने पेटले रान

उन्हाने पेटले रान
निपचित ही पडली शेते
सुनसान जाहले सारे
मृगजळास आले भरते

झाडांनी नाकारावी
सावली, जसा की मेघ
शिशिरात विस्मरे रीत
आटला नदीचा ओघ

उठतील धुळीचे लोट
पाचोळा धन मातीचे
भिरकावुन दिधला दूर
एकाकी जळत दुपार !

□□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४२९
रा. क्र. २३९५२
काव्य

## टाळ मृदुंगाच्या झाडा

टाळ मृदुंगाच्या झाडा
फुटे पालवी टाहोची
पैठतीरे सुगंधते
तुटे सावली घराची

विटंबिता जनरीत
बोल झेलताना कष्ट
पर्वा गुंडाळून ठेली
जग झाले जरी रुष्ट

पाऊले ही दिशाहीन
आणि चित्त सावधले
अंधाराच्या पालखीत
मना मिखीत नेले !

□□

# धूळ

धूळ दाटलेली    धूळ पसरली
धूळीत रेखली    चित्रे उमटली

वादळ येऊन    चित्रे पुसटली
धुळीला मिळाली    धुळीने गिळली

धूळ गंधहीन    धूळ सुगंधित
धूळ निराकार    धूळ आकारित

धूळ शून्य शून्य    धूळ त्रिकालज्ञ
धूळ अनाद्यंत    धूळ विश्ववंद्य

धूळ वर्तमान    धूळ भूतकाळ
भविष्यही धूळ    धूळ सर्व काळ

धूळ अन्यदात्री    धूळ सर्वसाक्षी
धूळ जन्मदात्री    धूळ सर्वभक्षी

धूळ पर्वतात    धूळ सागरात
धूळ आभाळात    धूळ नक्षत्रात

धूळ उगमात    धूळ संगमात
धूळ सूर्यतप्त    धूळ चंद्रशीत

मातीच्या घरांना    धूळीचा आधार
कुंभ जसा देह    धूळ आविष्कार

धूळ एक धून    मग्न प्रार्थनेत
अनावर प्राण    भावना सचेत

□□

## सूर उदास लागला

सूर उदास लागला
सूर मनाला भिडला

वाळवंटात काफिला
दिशादूर चाललेला
कुठल्याशा मुक्कामाला
कुणी सांगावे कशाला

राग कुणी आळविला
गंध दूर पसरला
धुंद माझिया मनाला
ध्यास तुमचा लागला

जात्या तुमच्या वाटेला
बसे लावुनिया डोळा
सांगा परतीची वेळा
सूर जपून ठेवला !

□ □

## तळ उठला जायचे

तळ उठला जायचे
शेर संपला जायचे

भावना ह्या वेड्यापिशा
गुंतू नये कुठे आशा
मोकळ्याच दाही दिशा
दिगंतरी निघायचे

कुठं मातीत रुजले
धाग्याधाग्यात विणले
असे मन गुंतलेले
बंध सारे तोडायचे

कृतज्ञता सावलीची
आभाळाची धरतीची
वृक्षवेलींच्या गंधाची
शब्द जड निरोपाचे !

□ □

## प्राप्त व्हावे

प्राप्त व्हावे दिव्य ज्याचा
केला अट्टाहास
माप रितेच पदरी
व्हावा उपहास
उपसाहू हासूनच
वेडा उपचार
अशी भरती ओहटी
चेष्टिते अपार !

□ □

REFBK-0023154
REFBK-0023154

## प्रकाशाचे दान

प्रकाशाचे दान घ्याया
आवतण काळोखाला
सूरसाज चढवाया
जीव कंठी उतरला

गाऊ तुज रिझवाया
गळा उकल पडेना
उमाळ्यात ओलाचिंब
कसा लागता लागेना

तुझी आरती गावया
आर्त मन आरवते
तुझे कीर्तन अपार
शब्द रूपात अडते !

□ □

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
२२२९
२३९५८
काव्य
ग्रं० शाखा